# सरावपत्रिका

**Date : 06 / 01/ 2014**

**प्र.१ खालील पत्र लिहा.**

संदिप / सुदिपा चव्हाण, लोकमान्य टिळक रोड, भांडूप (पू.), मुंबई - ४२ हा/ ही रस्त्यावरील कर्कश आवाजामुळे अभ्यासात येणाऱ्या व्यत्ययाबद्दल पोलीस इन्स्पेक्टर, भांडूप पोलीस स्टेशन, मुंबई - ४२ यांच्याकडे तक्रार करतो/ करते. (लिफाफा आवश्यक)

**प्र.२ खालील विषयावर दिलेल्या मुद्यांच्या आधारे १५० शब्दांपर्यंत निबंध लिहा.**

माझा आवडता छंद

(मुद्दे :- छंद म्हणजे काय ? - त्याचे महत्त्व - स्वतःचा आवडता छंद कोणता ? - त्याची जोपासना, संवर्धन - छंदातून होणारे मोठे कार्य - काही उदाहरणे - छंदाविषयी विचार - शेवट.)

**Date : 13 / 01/ 2014**

**प्र.१ खाली दिलेल्या मुद्यांवरून गोष्ट लिहा. योग्य शीर्षक देऊन तात्पर्य लिहा.**

मुद्दे : एक शेतकरी – स्वतःच्या विचाराने वागत नाही – एक म्हैस – खूप आवडती – चरायला नेणे – म्हैस पाणी पिण्यासाठी भटकणे – एक रांजण – तोंड घालणे – अडकणे – धडपड – काय करावे? – उंटावरून एक शहाणा – त्याने प्रकार पाहिला – मी खाली उतरणार नाही – उपाय सांगणे – मान कापा – पण डोके आतच – शहाण्याने सांगणे – आता रांजण फोडा – तात्पर्य.

**प्र.२ खालील विषयावर वृत्तांत लिहा.**

तुमच्या शहरातील स्वच्छता अभियानाचा वृत्तांत लिहा.

**Date : 20 / 01/ 2014**

**प्र.१ खालील पत्र लिहा.**

समीर देशमुख/ समिरा देशमुख, सेनापती मार्ग, पुणे हा/ ही व्यवस्थापक, मुलुंड स्पोर्टस्, मुलुंड, मुंबई -११, यांच्याकडे खेळाच्या साहित्याची मागणी करतो/ करते.या पत्राचा नमुना तयार करा. (लिफाफा आवश्यक)

**प्र.२ खालील विषयावर दिलेल्या मुद्यांच्या आधारे १५० शब्दांपर्यंत निबंध लिहा.**

सूर्य उगवला नाही तर ....

(मुद्दे :- रोज शाळेत जाण्याचा व सकाळी उठण्याचा कंटाळा - सूर्य उगवला नाही तर, - फक्त रात्र - सर्वत्र अंधार - लवकर उठण्याची गरज नाही - फक्त झोप - शाळा, क्लास, गृहपाठ नाही - फक्त मनोरंजन आणि टि.व्ही - वाईट परिणाम - प्राणीमात्रांचे जीवन - प्रकाश कसा मिळणार - भयानक स्थिती - सकारात्मक विचार - शेवट.)

**Date : 27 / 01/ 2014**

**प्र.१ खाली दिलेल्या मुद्यांवरून गोष्ट लिहा. योग्य शीर्षक देऊन तात्पर्य लिहा.**

मुद्दे : श्रीमंत म्हातारा – दोन नोकर – कोंबडा आरवला की म्हातारा उठे – नोकरांना उठवून काम करायला सांगे – नोकरांनी विचार करून कोंबड्याला मारणे – म्हाताऱ्याचे वेळी-अवेळी उठणे – नोकरांना उठवणे – नोकरांना पहिल्यापेक्षा जास्त काम – पश्चात्ताप – तात्पर्य.

**प्र.२ खालील विषयावर जाहिरात लेखन करा.**

आईस्क्रीमच्या दुकानाची जाहिरात करा.

**Date : 03 / 02/ 2014**

**प्र.१ खालील पत्र लिहा.**

संगिता/ सुजित काळे, विद्यार्थी प्रतिनिधी, ज्ञानदीप विद्यालय, भांडूप (पूर्व) येथून शाळेसमारील रस्ता नादुरुस्त असल्या कारणाने विभागीय अधिकारी, मुंबई महानगरपालिका, मुंबई यांना पत्र लिहिते/ लिहितो. (लिफाफा आवश्यक)

**प्र.२ खालील विषयावर दिलेल्या मुद्यांच्या आधारे १५० शब्दांपर्यंत निबंध लिहा.**

फाटक्या पुस्तकाचे आत्मवृत्त

(मुद्दे :- निर्मिती- त्यावेळी भोगाव्या लागणाऱ्या यातना - निर्मितीचा आनंद - त्यानंतरचा प्रवास - आजची स्थिती - अपेक्षा - शेवट.)

**Date : 10 / 02/ 2014**

**प्र.१ खाली दिलेल्या मुद्यांवरून गोष्ट लिहा. योग्य <u>शीर्षक</u> देऊन <u>तात्पर्य</u> लिहा.**

मुद्दे : एक वृद्ध शेतकरी – चार मुलगे – आपापसात भांडणे – शेतकऱ्याला चिंता – आजारी पडणे – एके दिवशी चौघांना एकत्र बोलावणे – प्रत्येकास एक एक काठी मोडण्यास देणे – चौघांनी मोडून दाखवणे – प्रत्येकास चार काठ्यांची मोळी तोडण्यास देणे – चौघांचे प्रयत्न असफल – तात्पर्य.

**प्र.२ खालील उतारा वाचून त्यावर <u>चार</u> प्रश्न तयार करा.**

आईने वासंतीला सर्व प्रकारच्या कामांची सवय लावली. तिने तिला स्वयंपाक करावयास शिकविला. त्या दोघी जात्यावर दळणही दळत असत. दळताना त्या सुंदर गाणी म्हणत! वासंतीची कविता तिच्या गाण्यांवर पोसली आहे. आज अपंग वासंती स्वतःचे काम स्वतः करतेच; पण शिवाय घरातीलही सर्व काही करू शकते. याचे श्रेय ती आपल्या आईला देते.

'शरीर थकले तरी मनाने थकू नये' असे वासंतीची आई नेहमी म्हणे. ते तिच्या मनावर ठसले होते; म्हणूनच घरापासून दूर असलेल्या विद्यापीठात ती जाऊ शकते. तेथील जिने स्वतः चढून एम.ए.च्या वर्गात जाऊन बसते. अडचणींवर मात करणे जे नाही त्याबद्दल दुःख न करत बसता मार्ग काढणे, यातच माणसाचे माणूसपण आहे. दुःखाने खचून जाण्यात नाही, असेच वासंती समजते.

**Date : 17 / 02/ 2014**

**प्र.१ खालील पत्र लिहा.**

रमेश / रमा जाधव, शारदा विद्यामंदिर, मु.पो. आंबिवली, तालुका - महाड, जिल्हा - रायगड येथून शाळेच्या मुख्याध्यापकांना गरीब विद्यार्थी फंडातून गणवेश व शैक्षणिक साहित्य मिळण्यासाठी विनंती अर्ज करतो / करते.

**प्र.२ खालील विषयावर दिलेल्या मुद्यांच्या आधारे १५० शब्दांपर्यंत निबंध लिहा.**

रम्य ते बालपण

(मुद्दे :- बालपण - बालपणीचा काळ सुखाचा - आठवणींची ठेव - बालपणातील वेगवेगळ्या आठवणी - केलेल्या खोड्या व त्यामुळे मिळालेली शिक्षा - पण शिक्षा म्हणजे भविष्यकाळाची दोरी - भूतकाळाची तमा नाही, भविष्यकाळाची चिंता नाही, जबाबदारी नाही - बालपणाइतके रम्य काही नाही.)

**Date : 24 / 02/ 2014**

**प्र.१ खाली दिलेल्या मुद्यांवरून गोष्ट लिहा. योग्य शीर्षक देऊन तात्पर्य लिहा.**

मुद्दे : शिंप्याचे दुकान – रस्त्यावरून हत्तीचे नदीला जाणे – शिंप्याच्या दुकानापाशी थांबणे – खाऊ मिळणे – शिंप्याला सलाम – एके दिवशी शिंपी गंमत करतो – सोंडेला सुई टोचतो – हत्तीला वेदना – नदीजवळचे घाणेरडे पाणी सोंडेत घेतो – शिंप्याच्या दुकानात फवारा उडवतो – तात्पर्य.

**प्र.२ खालील विषयावर वृत्तांत लिहा.**

वृक्षारोपण कार्यक्रमाचा वृत्तांत लिहा.

**Date : 03/ 03/ 2014**

**प्र.१ खालील पत्र लिहा.**

स्मिता / संदेश चव्हाण, विद्यार्थी प्रतिनिधी, आदर्श विद्यालय, नवी पेठ, नागपूर येथून मा. व्यवस्थापक, सोलापूर साखर कारखाना, सहकार नगर, सोलापूर येथे पत्र लिहून कारखाना पाहण्याची अनुमती मागते/मागते. (लिफाफा आवश्यक)

**प्र.२ खाली दिलेल्या मुद्यांवरून गोष्ट लिहा. योग्य शीर्षक देऊन तात्पर्य लिहा.**

मुद्दे : दोन मांजरी – लोण्याचा गोळा – त्याचे समान भाग याबद्दल वाद – झाडावरील माकडाचे येणे – तराजू आणणे – समान भाग करणे – दरवेळी एका पारड्यात जास्त – जास्तीचा भाग माकडाने खाणे – अखेरीस मांजरांना काही न मिळणे – माकडाचे पलायन – दोन मांजरांना शिकवण – तात्पर्य.

**Date : 10 / 03/ 2014**

**प्र.१ खालील विषयावर दिलेल्या मुद्यांच्या आधारे १५० शब्दांपर्यंत निबंध लिहा.**

शाळा बंद झाल्या तर........

(मुद्दे :- ही कल्पना कशी सुचली ? - तुम्ही कसे वागाल - फक्त खेळ मनोरंजन - कल्पनेचे दुष्परिणाम - प्रगती नाही - सर्वत्र अज्ञानाचा अंधार - वाईट परिस्थिती - कल्पना भयंकर - शेवट)

**प्र.२ खालील उतारा वाचून त्यावर चार प्रश्न तयार करा.**

मित्रांनो! प्रत्यक्ष उदाहरणाने जे शिक्षण मिळते, ते शेकडो व्याख्याने ऐकून किंवा अनेक ग्रंथ वाचूनही मिळत नाही. कृती ही मुकेपणाने बोलते. शब्दांहूनही ती परिणामकारक असते.

कसे जेवावे याची सुद्धा आपल्याकडे संस्कृती आहे. माझे वडील नेहमी सांगायचे, ''आपल्या पानाकडे पाहून जेवावे. पानावर वस्तू असता मागू नये. येईल तेव्हा घ्यावे. पंक्तीत सर्वांना वाढायला आणतील, तेव्हा आपणासही मिळेल. हावरेपणा करू नये. शिते पानाच्या खाली सांडू नये, पानात काही टाकू नये, पानावरील पदार्थावर टीका करू नये. पानात गुंतवळ किंवा काही सापडले तर निमूटपणे काढावे. वाच्यता करु नये. दुसऱ्यास ते दाखवू नये. कारण दुसऱ्यांना किळस येते. विषारी वस्तू सापडली तर मात्र सांगावे. पान कसे लखख करावे.'' या सांगण्याप्रमाणे वडील स्वतः वागत असत. मी अनेकांना जेवताना पाहिले आहे; परंतु माझ्या वडिलांचे जेवण झाल्यावर ताट जितके स्वच्छ व निर्मळ दिसे, तसे मी कोठेही पाहिले नाही.